डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० / २६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र : बार्टी/पुणे/सीव्हीसी विभाग/कार्या-१४/सेवा संकल्प अभियान /२०२६-२७/ ५९२९ दिनांक:- २७/०९/२६

# जाहीर आवाहन

**विषय :- दिनांक १७ सप्टेंबर, २०२६ ते दि.१७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यात "सेवा संकल्प अभियान" राबविणेबाबत.**

आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त व त्यांनी त्यांच्या कार्यकाळात "सेवा परमोधर्म" या उक्तीप्रमाणे सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहचविण्याचा अविरत प्रयत्न केला आहे. त्यांच्या सेवा कार्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने त्यांच्या वाढदिवसानिमित्त दि. १७ सप्टेंबर, २०२६ ते दि. १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राज्यात **"सेवा संकल्प अभियान"**, राबविण्याबाबत निर्णय घेतला आहे. मा.ना.श्री.संजय शिरसाट मंत्री, सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई, मा.ना.श्रीमती.माधुरीताई मिसाळ, राज्यमंत्री सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई व मा. डॉ. हर्षदीप कांबळे,प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली सदरचे **"सेवा संकल्प अभियान"**, राबविण्यात येत आहे.

**"सेवा संकल्प अभियान"**, अंतर्गत राज्यातील इयत्ता ११ वी विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना व १२ वी मध्ये शिकत असलेल्या व व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सन २०२६-२७ मधील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळणेसाठी सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीस्तरावर विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात येत आहे, जेणेकरुन समितीचे कामकाज अधिक पारदर्शक, लोकाभिमुख, व गतीमान होऊन विद्यार्थ्यांना विहित वेळेत वैधता प्रमाणपत्र देता येईल.

त्याअनुषंगाने, अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, एसईबीसी, विमाप्र व इतर मागास वर्ग इ. प्रवर्गातील विद्यार्थ्यांची समितीस्तरावर प्रलंबित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यासाठी त्रुटी पूर्ततेबाबत कॅम्पचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच Social Media तसेच इतर माध्यमातून जात प्रमाणपत्र पडताळणीच्या विशेष मोहिमेची माहिती देवून प्रचार व प्रसिध्दी करण्यात येत आहे.

त्रुटी पूर्तता करण्याबाबत Sms/ Email व पत्राव्दारे संबंधित समित्यांमार्फत अर्जदारांना कळविण्यात येऊनही अनेक अर्जदार/विद्यार्थी यांनी अद्यापही संबंधीत समित्यांशी संपर्क साधलेला दिसून येत नाही. अर्जाची त्रुटी पूर्तता करण्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारांची आहे. जात वैधता प्रमाणपत्रा अभावी पात्र मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळणेपासून तसेच पात्र अर्जदार वंचित राहू नये याकरिता ज्या अर्जदार/विद्यार्थ्यांनी अद्यापही वैधता प्रमाणपत्राबाबत त्रुटींची पूर्तता केलेली नाही, त्यांनी संबंधीत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीशी त्वरीत संपर्क साधावा व त्रुटींची पूर्तता करावी जेणेकरुन समितीला विहित वेळेत निर्णय घेता येईल असे आवाहन मा. श्रीमती. दिपा-मुधोळ-मुंडे, महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तथा मुख्य समन्वयक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या (सर्व) महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात येत आहे.